N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): पालघर  **P.S.**(ठाणे): घोलवड

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0201  **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/09/2023 01:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार
   **Time Period** (कालावधी): पहर 4
   **Date From** (दिनांक पासून): 21/09/2023
   **Date To** ( दिनांक पर्यत): 21/09/2023
   **Time From** (वेळेपासून): 12:50 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 12:50 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 22/09/2023  **Time** (वेळ): 01:37 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 004
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 22/09/2023 01:37 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 7 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, झाई बोरीगाव,तलासरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नारायण रामु पटेल

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1957

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | 833568200976 |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर क्र 206,राई,पोस्ट वाकी ,डहाणु,घोलवड,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर क्र 206,राई,पोस्ट वाकी ,डहाणु,घोलवड,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9270255787

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल भागोजी पाटील | | | 1. ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव, तलासरी,घोलवड,पालघर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमित दिलीप दुबळा | | | 1. ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव, तलासरी,घोलवड,पालघर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री.नारायण रामु पटेल, वय 66 वर्षे, व्यवसाय- प्लबिंग, रा. घर क्र.206, राई, पोस्ट-वाकी, ता.डहाणू, जि.पालघर, मो.क्र. 9270255787,आधारकार्ड नं.833568200976 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,

मी वरीलप्रमाणे असून मी प्लबिंगचा व्यवसाय करतो व आजुबाजुच्या परिसरातील गावात, वाडया-वस्त्यावर, सरकारी ऑफिस व घरांना नळजोडणीची शासनाची कामे करीत असतो.

नोव्हेंबर 2022 मध्ये ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव येथील उप सरपंच श्री प्रकाष पाटील यांनी फोन करून बोलवुन सांगितले की, त्यांच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत अस्वाली डॅम ते झाईपर्यतची पाण्याची मुख्य पाईपलाईन तुटलेली आहे ती पाईप लाईन दुरूस्ती करायची आहे. असे सांगून त्यांच्या गावात अजुनही पाईप लाईनची कामे आहेत ती तु कर असे सांगितले. त्याप्रमाणे मी अस्वाली डॅम ते झाईपर्यतचे पाईप लाईनचे काम नोव्हेंबर 2022 ते डिसेंबर 2022 पर्यत पुर्ण केले. त्यादरम्यान झाई-बोरीगाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी, सरपंच आणि उप सरपंच यांनी गावातील माझे संबधाने इतर कामे माझ्याकडून करून घेतली. त्यामध्ये अस्वाली डॅमच्या विहीरीतील मोटार काढणे व टाकणे इत्यादी कामे करून घेतली. सर्व कामाचे मिळून एकुण 34,000/- रूपये माझे बिल झाले.

अस्वाली डॅम ते झाईपर्यतचे पाईप लाईनचे काम चालु असताना ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी श्री.सुनिल पाटील यांनी मला त्याच्या ऑफिसमध्ये बोलावून चालु असलेल्या कामाबद्दल 20,000/- रूपयाचा बेअरर चेक अँडव्हान्स म्हणुन मला दिला. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी श्री.पाटील हे, ''तुझे काम पुर्ण व्हायच्या अगोदर अँडव्हान्स चेक देतोय, लक्षात ठेव'' असे बोलले.

डिसेंबर 2022 मध्ये मला दिलेली ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव हद्दीतील सर्व प्रकारची कामे पुर्ण केल्यानंतर माझ्या उर्वरीत बिलासाठी मी पंधरा ते वीस वेळा ग्रामपंचायत कार्यालयात जावून ग्रामविकास अधिकारी पाटील यांना भेटून माझ्या उरलेल्या बिलाविषयी विचारत होतो त्या त्या वेळी ते काहीतरी कारण सांगुन मला माघारी पाठवून दयायचे. दरम्यानच्या काळात एकदा, त्यांनी मला काम दिलं, अँडव्हान्स पैसे दिले आहेत असे सांगून त्यासाठी त्यांनी 6,000/- रूपये मागितले होते. परंतु मला त्यांना पैसे दयायची इच्छा नव्हती. परंतु सगळे पैसे मिळल्यानंतर बघू असे म्हणून मी त्याच्याकडे दुर्लक्ष केले.

त्यानंतर मी 11/09/2023 रोजी ग्रामविकार अधिकारी श्री.पाटील यांना फोन करून ते ऑफिसमध्ये असल्याची खात्री करून त्यांच्या ऑफिसला गेलो. त्यावेळी मला सरपंच, उप सरपंच व ग्रामविकास अधिकारी श्री.पाटील हे भेटले त्यावेळी माझ्या उरलेल्या बिलाची मागणी केली त्यावेळी ग्रामविकार अधिकारी पाटील यांनी कार्यालयाच्या बाहेर येवून मला उरलेल्या चौदा हजाराचा बिलाचा चेक दिला. चेक देताना मागे सांगितल्याप्रमाणे मला 6,000/- रूपये आणून दयायचे, येताना दिनांक 19/01/2023 रोजीचे 20,000/- रूपये रक्कमेचे एक व दिनांक 11/09/2023 रोजीचे 14,000/- रूपये रक्कमेचे एक अशी 34,000/- रूपये रक्कमेची दोन बिले घेवून ये असे सांगितले. परंतु मला त्यांना पैसे दयायचे नव्हते म्हणून मी काहीच हालचाल केली नाही हे त्यांच्या लक्षात आल्याने ग्रामविकास अधिकारी श्री.पाटील यांनी दि. 11/09/2023 ते 18/09/2023 पर्यत मला दहा ते बारावेळा त्यांच्या 7507196169 या नंबरवरून कॉल करून पैशाची मागणी केली. एक दोन वेळा मी मला कामाचे सगळे पैसे मिळाल्याने मी त्यांना तुम्हाला पैसे देणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे बोललो होतो.

दिनांक 18/09/2023 दुपारी अडीच तीनच्या आसपास ग्रामविकास अधिकारी पाटील यांचा मला त्यांच्या मोबाईल वरून कॉल आला, त्यावेळी त्यांनी मला मी गुरूवारी एक वाजेपर्यत ऑफिसमध्ये आहे, मी सागितल्याप्रमाणे

पैसे व बिल घेवून ये असे सांगून फोन बंद केला. मला या गोष्टीचा वैताग आल्याने मला ग्रामविकास अधिकारी श्री. सुनिल पाटील यांना 6,000/- रू लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 20/09/2023 रोजी त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई होणेकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांना माझी सदरची तक्रार फोनवरून सांगितली तसेच दिनांक 21/09/2023 रोजी मला पालघर येथे येणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी मला दिनांक 21/09/2023 रोजी सकाळी 10.30 वाजता डहाणू खाडी नाका, येथे थांबण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक 21/09/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे हे डहाणू खाडी नाका येथे येवून त्यांनी माझी भेट घेवून त्यांची ओळख सांगून तसेच माझी ओळख करून घेवून शासकिय वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी मला त्यांचेसोबत असलेले, पोहवा/सुतार, पोहवा/धारणे, चालक पोशि/गवळे तसेच त्यांचे सोबत असलेले दोन पंच साक्षीदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी माझी लिहुन आणलेली तक्रार त्यांना दिली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी माझी लेखी तक्रार वाचून सदर तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करण्याकरीता त्यांचे सोबत असलेले दोन पंच साक्षीदार हे पंच म्हणून कामकाज करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी मी दिलेल्या तक्रारीची हकीकत दोन्ही पंचाना सांगून मी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. सदरची तक्रार वाचल्यानंतर दोन्ही पंचांनी व पोलीस उप अधीक्षक श्री. गावडे यांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने ग्रामविकास अधिकारी श्री.पाटील हे लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबत एक पंच साक्षीदार यांचे समक्ष त्यांचे कार्यालयात जावून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय झाई- बोरीगाव हे डहाणू खाडी नाका येथुन लांब असल्याने मी व पडताळणी पथक ग्रामपंचायत कार्यालयापासुन एक किलोमिटर अंतरावर येवून थांबलो. त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून दिल्यानंतर मी व पंच नं.1 श्री.दिघे असे माझेकडील मोटार सायकलने सुनिल पाटील, ग्रामविकास अधिकारी यांना भेटण्यास ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव येथे गेलो. त्यावेळी सुनिल पाटील, हे त्यांचे केबिनमध्ये बसलेले होते. त्यावेळी मी व पंच नं.01 श्री.दिघे यांचेसह सुनिल पाटील, ग्रामविकास अधिकारी यांचे केबिनमध्ये गेलो. त्यावेळी त्यांनी मला सोबत कोण आहेत असे विचारले असता मी त्यांना माझा भाऊ आहे असे सांगितले. त्यानंतर माझे कामाचे अनुषंगाने बोलणे झाल्यानंतर लोकसेवक पाटील हे मला अगोदर ठरल्याप्रमाणे देवून टाक. त्यावेळी मी त्यांना किती ठरले असे विचारले असता त्यांनी मला ''तुम्हालाच माहित, आता मी काय सांगू, माझं काय... काय बोललो मी तुम्हाला'' असे बोलले त्यावेळी मी त्यांना नाय बोलला नाय, त्यावेळी ते बोलला होता ना साहेब सहा हजार म्हणून असे बोलले तेव्हा त्यांनी मला हा असे बोलले असता मी त्यांना एवढे मला नाय देता येणार ना साहेब असे सांगितले. त्यानंतर श्री.पाटील यांनी मला ''मी सांगितलं होतं ना तुला...तुला सगळं माहित आहे...पाच हजार दे जा.''असे बोलले त्यावेळी मी त्यांना पाच हजार जास्त होईल असे सांगितले. त्यावेळी श्री.पाटील यांनी मला ''अरं तुझं सहा हजाराचं ठरलं होतं ना..मग एकच हजार मी जास्त सांगितले असे बोलले'' त्यावेळी मी त्यांना माझे नातेवाईक देहरे येथे आहेत तुम्हाला दहा ते पंधरा मिनीटात आणून देतो असे सांगितले. त्यावेळी ते मी नसलो तर पैसे शिपाई अमित यांचेकडे दे असे मला म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.01 श्री.दिघे असे माझे कडील मोटार सायकलने ठरल्याप्रमाणे शासकिय वाहनाजवळ परत आलो.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. गावडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मधील माझे व श्री.पाटील, ग्रामविकास अधिकारी यांचेमध्ये रेकॉर्ड झालेले बोलणे ऐकले असता श्री.पाटील, ग्रामविकास अधिकारी यांनी माझेकडे मी केलेल्या कामाचे बिल मंजुर करण्यासाठी आणि बिलाची रक्कम मला आगाऊ मिळवून देण्यासाठी मला केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून माझ्याकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचे सुचनेप्रमाणे मी हजर केलेल्या 5,000/-रूपये रक्कमेवर पंच साक्षीदार यांचेसमक्ष सापळापूर्व कारवाई पूर्ण करून सदरच्या लाचेच्या रकमेसह माझ्या अंगावर व्हाईस रेकॉर्डर लावून दिल्यानंतर ''मी व पंच नं. 1श्री.दिघे असे माझेकडील मोटारसायकलने ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव ता.तलासरी, जि.पालघर कार्यालय येथे येवून ग्रामपंचायत कार्यालयात गेलो. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी सुनिल पाटील हे त्यांचे केबिनचे बाहेर जाण्याचे तयारीत उभे होते. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी पाटील यांनी मला कुठे गेलेला असे विचारले त्यावेळी मी त्याना देहरी या गावी गेलो होतो असे सांगितले. त्यानंतर ग्रामविकास अधिकारी पाटील यांनी पंच नं.1 श्री.दिघे यांना तुम्ही कुठून आलेत, काय काम करता असे विचारले असता पंच नं.1 श्री.दिघे यांनी त्यांना भाऊ आहे तसेच माझेसोबत प्लंबिंग चे काम करतो असे सांगितले. त्यानंतर मी माझे उजव्या हाताने शर्टाच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढून ती ग्रामविकास अधिकारी सुनिल पाटील यांचे समोर

धरली असता त्यांनी मला ''तिकडे ठेव, दे ना अमितकडे'' असे बोलले. त्यावेळी शिपाई अमित दुबळा हे कार्यालयातील काउंटर चे आतिल बाजूस होते. त्यावेळी मी लाचेची रक्कम घेवून शिपाई अमित दुबळा यांचेजवळ गेलो असता त्यावेळी त्यांनी मला हाताचे बोटाने इशारा करून सदर लाचेची रक्कम ग्रामपंचायत कार्यालयातील टेबलाचे काउंटरवर ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी सदरची लाचेची रक्कम टेबलाचे काउंटरवर ठेवली. त्यादरम्यान ग्रामविकास अधिकारी श्री पाटील हे ग्रामपंचायत कार्यालयातून खाली उतरू लागले त्यानंतर मी व पंच नं.1 श्री.दिघे असे कार्यालयाचे बाहेर आलो व मी डोक्यावर हात फिरवून लाचेचे रक्कमेचा स्विकार झालेबाबतचा पूर्वनियोजित ईशारा केला असता जवळ असलेले पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी माझे जवळ येवून लाचेची रक्कम कोणी स्विकारली याबाबत मला विचारणा केली असता मी ग्रामपंचायत शिपाई अमित दुबळा कडे हाताचे बोटाने इषारा करून दाखवून मी व पंच नं.1 श्री.दिघे असे कार्यालयाचे खाली उतरलो. काही वेळाने पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे व सापळा पथक श्री.अमित दुबळा यांना घेवून खाली आल्यानंतर त्याठिकाणी झाडाखाली थांबलेले श्री.पाटील, ग्रामविकास अधिकारी यांना पथकाने ताब्यात घेतले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाकडून दिनांक 21/09/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान मी ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगावच्या हद्दीत डिसेंबर 2022 पर्यत प्लंबिंगचे काम केलेले होते. सदर केलेल्या कामाचे बिल मला मिळालेले असुन मी केलेल्या सदर कामाचे बिल मंजुर करण्यासाठी आणि बिलाची रक्कम मला आगाऊ मिळवून देण्यासाठी श्री सुनिल भागोजी पाटील, वय 53 वर्षे, ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव, ता.तलासरी, जि.पालघर यांनी मला केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून माझेकडे 5,000/रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून ती रक्कम श्री.अमित दिलीप दुबळा वय 35 वर्षे, शिपाई, ग्रुप ग्रामपंचायत झाई-बोरीगाव, ता.तलासरी, जि.पालघर यांना देण्यास सांगितले असता श्री.अमित दुबळा यांनी सदरची लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवुन ती मला ग्रामपंचायत कार्यालयातील कांउटरवर ठेवण्यास सांगुन स्विकारल्याने त्यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद मी सांगिल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

gajanan dyandev padvalkar(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name**(नाव): ...nath dyandev pa
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

पोलीस ठाणे अंमलदार
सासवड पोलीस ठाणे